## प्रकरण पाचवे

## : उपसंहार :

बाबुरावांचा जन्म २६ डिसेंबर,१८९९ मध्ये मध्यम वर्गीय ब्राम्हण कुटुंबात झाला [१]. त्याचे मुळ पूर्वज कोकणात मोल मजूरी करून उपजिवीका करीत असत. अर्थार्जनासाठी त्यांचे पंजोबा ( गोपाळरावांचे वडील ) मुलूख सोडून कोल्हापूर जिल्ह्यातील कोरीवडे गावी स्थाईक झाले.कालांतराने बाबुरावांचे वडील शिक्षणासाठी बेळगावला आले व व्यवसायानिमित्य बेळगाव मध्ये स्थाईक झाले [२]. आई-वडील रमाबाई - राजाराम, लहान भाऊ यशवंत आणि जेष्ट भगिनी - चिम्माक्का, शांती, सुभद्रा असा यांचा मोठा परिवार होता [३]. आपल्या तिन्ही बहिनींना वडीलांनी मुलकीपर्यंत ( सातवी ) शिक्षण देऊन त्यांचे विवाह केले होते. पण तिन्ही बहिणींना अकाली वैधत्व प्राप्त झाल्यामुळे बाबुरावांच्या घरावर उदासिनतेचे सावट पडलेले होते. तरीही त्यांना सतत खुष ठेवण्याचा प्रयत्न केला जात होता.

बाबुरावांचे वडील पोलीस खात्यात नोकरीस असल्यामुळे बदलीचे प्रसंग वारंवार येत असत, त्यामुळे शिक्षणाची हेलसांड होणे शक्य होते. पण तरी सुध्दा आपल्या मुला-मुलींनी शिकावे या विषयी बाबुरावांचे वडील नेहनी दक्ष होते. बाबुरावांचे वडील स्वत: सरकारी नोकर असल्यामुळे आपल्या मुलांनी सुध्दा खूप शिकावे व आपल्याप्रमाणे सरकारी नोकरीत प्रवेश करून आनंदी जीवन जगावे अशी त्यांची पितासुलभ इच्छा असणारच. कांही अंशी बाबुरावांच्या कनिष्ठ बंधुनी - यशवंतरावानी आपले शिक्षण बी.ए. १९२४ मध्ये व एल.एल.बी. १९२७ मध्ये पूर्ण करून वकिली व्यवसायात प्रवेश करून आपल्या पित्याची इच्छा पूर्ण केली [४]. पण बाबुरावांच्या

..

बाबतीत हे घडू शकले नाही. लौकिक अर्थाने बाबुरावानी आपले प्राथमिक व माध्यमिक शिक्षण बेळगाव येथे व महाविद्यालयीन शिक्षण सांगली ( विलींग्डन महाविद्यालय ) येथे घेतले [५]. पण त्यांचे मन शालेय पुस्तकात आणि अभ्यासक्रमात रमले नाही, उलट अभ्यासेत्तर संगीत, नाटक, खेळात, हॉकी व क्रिकेट यात रमले. वाचनाची त्यांना आवड असल्यामुळे त्यांचे अवांतर वाचन बरेच झाले. त्यात विभिन्न देशाच्या इतिहासाचा समावेश होता. मुख्यत्वेकरून नेपोलियन बोनापार्ट, मॅझिनी, स्वामी विवेकानंद, या थोर व्यक्तिंच्या चरित्राचे वाचन बरेच झाले [६] आणि त्यांच्या बालमनावर त्यांच्या कार्याचा निश्चितच परिणाम झाला. अवांतर वाचनाबरोबरच अभ्यासेत्तर गोष्टीत सुध्दा बाबुरावांनी तरूण पणातच मुख्यत: महाविद्यालयीन जीवनात पुढाकार घेतला. गोपाळ गणेश आगरकर ( १८५६-९५ ), लोकमान्य टिळक ( १८५६-१९२० ) यांच्या अनुक्रमे सामाजिक व जहाल विचारसरणीने देशातील मुख्यत्वे करून महाराष्ट्रातील युवा पिढीवर बराच प्रभाव होता. परिणामत: बाबुरावांना सुध्दा सामाजिक कार्याची ओढ निर्माण झाली. समाजातील अंधश्रध्दा, जातीयता, अस्पृश्यता इ. च्या निर्मूलनासाठी विविध थरात निर्माण होणारे प्रयत्न याचा त्यांच्या सुजान व सुसंस्कृत मनावर योग्य तो परिणाम झाला आणि स्वत: सुध्दा समाजसुधारणा करावी या उद्देशाने ग्रासले. परिणामत: त्यानी आपल्या सहकार्यांच्या मदतीने भारत वैभव समाजाची दि.२५-१०-१९१८ रोजी स्थापना केली [७]. पुढे आता आपले विचार युवा पिढीपर्यंत पोहचविण्याकरिता व त्यांच्यात राजकीय जागृती करण्याकरिता " विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यासाठी चालविलेले " तरूण भारत मासिकाची स्थापना सन १९१९ मध्ये केली [८].

..

महात्मा गांधीच्या रूपाने देशाला एक महान पण नवीन नेता मिळाला आणि त्यांच्या नेतृत्वाखाली भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचा कार्यक्रम हाती घेतला आणि भारतीय युवा पिढीकडून त्यास प्रचंड प्रतिसाद मिळाला. बाबुरावांनी इतर हजारो विद्यार्थ्यांप्रमाणे शिक्षणास रामराम ठोकला व असहकार आंदोलनात भाग घेतला [१]. बाबुरावांचे वडील पोलिस खात्यात असल्यामुळे त्यांचे कृत्य वडीलांना आवडले नाही, कारण त्यामुळे त्यांच्या खात्याचा रोष त्यांच्यावर येऊन नोकरी जाण्याचीही शक्यता होती, हे नाकारता येणार नाही. आणि स्वाभाविकरित्या बाबुरावांच्या स्वातंत्र्य लढयाच्या कार्यास त्यांचा विरोध असणार हे पण स्वाभाविक होते. पण तरीसुध्दा त्यांच्या विरोधास न जुमानता बाबुरावांनी स्वातंत्र्य चळवळीत उडी घेतली. हे त्यांच्या बेडखोर स्वभावाचे द्योतक आहे. त्यामुळेच त्यांच्या जीवनास वेगळे वळण मिळाले.

अशारितीने विद्यार्थी दशेतच राजकीय, सामाजिक आणि वृत्तपत्रक्षेत्रात त्यांनी हिरारीने प्रवेश केला. तसेच त्यांच्या भावी जीवनाची वाटचाल या तीन व शिक्षण प्रसार व प्रौढ शिक्षण या चौथ्या वाटेवरून झाल्याचे दिसते.

[illegible] :-

असहकार चळवळीपासून बाबुरावांच्या राजकीय जीवनाचा श्रीगणेशा झाला. सन १९२०-१९४७ या कालातील चळवळीत बाबुरावांनी हिरारीने भाग घेतला. या चळवळीत त्यांच्यावर ज्या लहान लहान भूमिका व जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या त्या त्यांनी यशस्वीपणे व जबाबदारीने निभाऊन नेल्या, आणि हे करीत असताना हळूहळू त्यांचे नेतृत्व विकसीत झाले. कॉंग्रेसप्रणीत स्वातंत्र्याच्या चळवळीत ते

..

नेहमीच अग्रेसर असल्यामुळे त्यांना अनेकदा कारावासात डांबण्यात आले. असहकार चळवळीचा एक कार्यक्रम ' दारूदुकानासमोर पिकेटींग ' केल्या कारणाने त्याना सर्वप्रथम १९२१ मध्ये कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली, आणि बेळगाव येथील जेलमध्ये तीन महिन्याकरिता डांबण्यात आले [१०]. तसेच सविनय कायदेभंगाच्या चळवळीत हिंडलगा जेल समोरच प्रक्षोभक भाषण केल्या कारणाने त्याना सहा महिने बेळगाव जवळील हिंडलगा तुरुंगात ठेवण्यात आले [११]. ती शिक्षा भोगून आल्यावर त्यांच्यावर बेळगाव सिटी पोलीस कचेरीवर दररोज ( १९३२ ) हजेरी देण्याचे बंधन लादण्यात आले, पण त्यानी ते झिडकारून टाकल्यामुळे त्याना एक वर्षाची कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली [१२]. एव्हाना बाबुरावांची प्रमुख पुढाऱ्यात गणना ( जिल्हा काँग्रेस सचिव ) होत असल्यामुळे, त्यांना हिंडलगा जेलमध्ये ठेवणे सरकारला अयोग्य वाटल्याने बेळगावपासून लांब नासिक येथे त्यांची रवानगी करण्यात आली.

सन १९४२ च्या चलेजाव आंदोलनात बाबुरावाना पुन्हा एक वर्ष दहा महिने मुदतीचा कारावास ठोठावण्यात आला.[१३] व परत त्याची नासिक जेल मध्येच रवानगी करण्यात आली.

बाबुरावाना झालेला कारावास हाच त्यांच्या राजकीय कार्याची एक प्रकारची पावतीच होती. जेंव्हा जेंव्हा ते कारावासातून शिक्षा भोगून परत आले तेंव्हा प्रत्येकवेळी बेळगावच्या जनतेने त्याना खांद्यावर घेतले.

एक स्वयंसेवक म्हणून १९२३ च्या काकीनाडा ( आंध्र प्रदेश ) काँग्रेस अधिवेशनात बाबुरावांनी बेळगाव जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व केले [१४].

..

ऐवढेच नव्हे तर १९२४ चे कॉंग्रेसचे बेळगाव येथील कॉंग्रेस अधिवेशन यशस्वी करण्यात बाबुरावांचा व त्यांच्या स्वयंसेवकांचा हातभार होता [१५].

ब्राम्हणेत्तर पक्षाचे प्रमुख पुढारी आण्णासाहेब लठ्ठे याना जाणीवपूर्वक कॉंग्रेसमध्ये आणून, बेळगाव कॉंग्रेसचा जाणीवपूर्वक प्रभाव वाढविण्यात व कॉंग्रेस विरोधकांच्या विरोधाची धार बोथट करण्यात बाबुरावांनी फार मोठी भूमिका पार पाडली. तसेच बेळगाव परिसरातून झालेल्या कौन्सिल व मुंबई विधी मंडळाच्या निवडणूकीत जे कॉंग्रेसला यश मिळाले ते बहुतांशी बाबुरावांच्या प्रयत्नामुळेच [१६].

युवा व तरुण पिढीस स्वातंत्र्य चळवळीचे सदा स्मरण रहावे, त्यापासून स्फूर्ती मिळावी म्हणून " स्वातंत्र्य चळवळीस चिरंतन " करण्यात बाबुरावानी मोठा वाटा उचलला.

ब्रिटीश धार्जिन्या राजनिष्ठांचा ब्रॅबोर्न रोड असे नामकरण करण्यांचा कुटील डाव उधळून लावून त्या रस्त्याचे " कॉंग्रेस रोड " असे नामकरण करण्यात त्यांचाच पुढाकार होता [१७].

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर हुतात्म्याच्या स्मरणार्थ बेळगाव मध्ये हुतात्मा स्मारक उभे करण्यात सुध्दा त्यांचाच आग्रह अधिक होता.

एक स्वातंत्र्य सेनानी म्हणून कॉंग्रेसप्रणित राजकीय कार्यक्रम बेळगाव परिसरात व्यवस्थित राबवून तरूण कार्यकर्त्यांची नवीन फळी निर्माण करण्यात बाबुरावांचे महत्वाचे योगदान लाभले आहे.

..

एक शिक्षण प्रसारक म्हणूनसुध्दा बाबुरावांचे कार्य मरीव आहे. त्यानी दिनांक २५-१०-१९३७ रोजी " बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समितीची " स्थापना करून [१९] ज्या भागात रस्ते नाहीत, जाण्या-येण्याच्या सुविधा नाहीत, घनदाट अरण्या, डोंगर द-या अशा भागातून दिवसा-रात्री प्रवास करून खेडोपाडी शिक्षणाचे जाळे विनले. बाबुरावांनी श्रमदानातून, स्वावलंबनाच्या तत्वावर गावक-यांच्या मदतीने " व्हॉलंटरी स्कूल्स " ( मदत शाळा ) उभारणी केली. पण शाळांची उभारणी करण्यापूर्वी त्यानी शिक्षणाविषयी जागृती निर्माण करण्यासाठी, आवड निर्माण करण्यासाठी १९३७ मध्ये व्यापक स्वरूपात प्रचार दौरे आयोजित करून [१९] व वृतपत्रातून " एकही निरक्षर अंगठेवाला राहू देऊ नका ," " साक्षरतेच्या मोहिमेस मदत करा ", शिक्षणाशिवाय विकास होणार नाही" [२०] असे लेख लिहून शिक्षणाविषयी जागृती निर्माण केली. बाबुरावांच्या प्राथमिक शाळेचा श्रीगणेशा दिनांक १०-१२-१९३७ रोजी चंदगड महालातील नांदुवडे येथे व दुसरी शाळा खानापूर तालुक्यातील गवाळी येथे दिनांक १६-१२-१९३७ रोजी सुरू केली [२१]. पुढील दहा वर्षांच्या कालावधीत समितीतर्फे बेळगाव परिसरातील विभिन्न भागात १८० शाळा शिक्षण प्रसाराचे कार्य करीत होत्या [२२].

या शाळा कार्यक्षमपणे चालाव्यात म्हणून प्रत्येक गाव पातळीवर ५ ते ६ लोकांची " स्कूल पंच " व विभागीय पातळीवर सुपरवायझर्सच्या [२३] नेमणूका केल्या. कोणत्याही अर्थाने ही प्रगती लक्षणीय आहे. कारण देश पारतंत्र्यात असताना शिक्षण प्रसारासाठी अविश्रांत घडपडणारा बेळगाव परिसरात दुसरा कोणीही प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही.

..

बाबुराव ठाकूर जर मराठी भाषिक असले तरी शिक्षण प्रसाराबाबत त्यांचा व्यापक दृष्टीकोन दिसून येतो. कारण त्यानी कानडी, व उर्दू शिक्षणाच्या शाळा सुरू करण्याकडे लक्ष दिले - मराठी शाळा सुरु करण्याकडे दिले होते [२४].

बाबुरावांचे शिक्षण प्रसार कार्य केवळ प्राथमिक शिक्षणापर्यंत मर्यादित न राहता ते उच्च महाविद्यालयापर्यंत पोहचले होते हे राणी पार्वतीदेवी महाविद्यालयाच्या स्थापनेवरून दिसून येते [२५].

शिक्षण प्रसाराबरोबरच शिक्षणाचा दर्जाबाबत व विद्यार्थ्यांवर करावयाच्या संस्काराबाबतही बाबुराव सतत जागरूक होते. शिक्षक प्रशिक्षित असेल तर अध्यापनाचे कार्य प्रभावीपणे करतो हे बाबुराव पूर्णपणे जाणून होते. पण जवळपास अध्यापक महाविद्यालय नव्हते. परिणामत: ही अडचण कांही अंशाने कां होईना दूर करण्यासाठी व शिक्षकांची बौध्दिक पातळी वाढविण्यासाठी सन १९३८, १९४१ आणि १९४२ साली त्यानी शिक्षकासाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केल्याचे दिसते [२६]. पण अध्यापक महाविद्यालयाची, दर्जेदार शिक्षणातील गरज लक्षात घेऊन बाबुरावांनी १९४२ मध्ये बेळगाव येथे अध्यापक महाविद्यालयाची स्थापना केली [२७]. हे नुसतेच अध्यापक महाविद्यालय नव्हते, तर बेळगाव परिसरातीलच नव्हे तर त्या भागातील पहिले सहशिक्षणाचे महाविद्यालय बनविण्याचा बहुमान बाबुरावांच्या प्रयत्नामुळे महाविद्यालयास मिळाला.

ज्याप्रकारे शिक्षण व शिक्षकांचा दर्जा उंचावण्यासाठी बाबुराव प्रयत्नशील होते, तसेच आपल्या शाळेतील विद्यार्थी व्यसनापासून व मादक पेयापासून अलिप्त राहिला पाहिजे, तो अहिंसात्मक

..

बनला पाहिजे, तो मनाने, व विचाराने उच्च निघाला पाहिजे [२८]. यासाठी प्रयत्नशील होते. यावरून बाबुराव शिक्षण प्रसारा बरोबरच शिक्षणाच्या दर्जासंबंधी जागरूक होते, तसेच आपल्या शाळेतून एक सुसंस्कृत, सज्ञान विद्यार्थी बाहेर पडला पाहिजे या ध्येयाने त्यांनी शिक्षण प्रसाराचे कार्य अंगिकारल्याचे दिसते.

याशिवाय कामगार वर्गातील अज्ञान व शोषण कमी करण्यासाठी बाबुरावांनी कामगार वर्गासाठी एकूण सात शाळा स्थापन केल्या होत्या [२९]. तसेच निरक्षरता कमी करण्यासाठी शेतक-यांच्यासाठी सन १९३८ ते १९४१ पर्यंत प्रौढ शिक्षणाच्या पाच शाळा सुरू केल्या [30]. यावरून निरक्षरता हा भारतीय समाजास लागलेला कलंक पुसण्यासाठी बाबुराव फार वर्षापूर्वी प्रयत्नशील होते हे दिसते.

बाबुरावांनी समितीमार्फत अशा प्रकारच्या ' व्हॉलंटरी स्कूल्स ' स्थापन केली होती. त्याच धर्तीवर सन १९३८ नंतर मुंबई सरकारने राज्यात शाळांचे जाळे विणले होते [३१]. यावरून त्यांचे शिक्षण प्रसार कार्य किती आदर्श होते हे दिसून येते.

बाबुरावांच्या स्वातंत्र्यपूर्वी काळात कामगार वर्गासाठी रात्रशाळा, तसेच प्राथमिक ते उच्च महाविद्यालयीन शिक्षण, अध्यापक महाविद्यालयाची स्थापना यासारखे जे बहुमोल कार्य केले आहे, त्यामुळे शेतकरी वर्ग देशी-विदेशी घटनाशी, कार्याशी निगडीत बनून तो राजकीय प्रवाहात सहभागी झाला. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्य चळवळ गतिमान बनली. एवढेच नव्हे तर, त्यांनी शिक्षण लमाण तांडा व अस्पृश्यांच्या वस्तीपर्यंत नेऊन सोडून शिक्षण क्षेत्रातील मक्तेदारी संपुष्टात आणली असेच म्हणावे लागेल.

सामाजिक कार्यात सुध्दा एखाद्या समाज सुधारकाप्रमाणे बाबुराव सतत आघाडीवर राहिले. भारतात अस्तित्वात असलेल्या सामाजिक विषमतेच्या भिंती जशाप्रकारे नाहीशा करण्यासाठी सुधारकांनी प्रयत्न केले, तशाच प्रकारचे कार्य बाबुरावांनी बेळगाव परिसरात केले.

अंध:श्रध्दा निर्मूलनासाठी बाबुराव सतत प्रयत्नशील होते हे हेरे. (ता. बेळगाव) गावच्या प्रसंगावरून दिसून येते [32]. तसेच मानवी प्रगतीच्या मार्गातील अस्पृश्यता हा अडथळा असल्यामुळे ती नाहीसा करण्यासाठी जातीव्देष, पंथव्देषाचा त्याग करा, इतरानाही मनुष्य म्हणून जगू द्या [33], असे संपादकीय लिहून अस्पृश्यतेविरूध्द जागृती करीत होते. सन १९३३ मध्ये चंदगड, शेडवाळ, उगार, मुरगुडी इ. गावातील सभेतून बाबुरावांनी सामाजिक न्याय व समतेचा पुरस्कार केला [34]. त्यांनी बेळगाव शहरातील संडासची सफाई करून [35] आपण कृतिशील समाज सुधारक असल्याचे दाखवून दिले. एवढेच नव्हे तर १९२२ व १९३३ मध्ये बाबुरावांनी बेळगाव शहरात हरिजनासह मंदिर प्रवेशाची क्रांतीकारी चळवळ यशस्वी केली [36].

बाबुरावाचे नागरी कार्य सुध्दा तेवढयाच तोलामोलाचे आहे. बाबुरावांनी चंगदड महालातील ८० खेडयातून मोठया प्रमाणावर रस्ते व गटारे काढण्याचे कार्य हाती घेतले [37]. या शिवाय खेडे गावापासून मुख्य शहर किंवा रस्त्याला रस्त्याव्दारे खेडी जोडून त्यांनी ग्रामीण जीवनाचा संबंध शहरी जीवनाशी जागला. त्यामुळे त्याना देशी-विदेशी घटनांची माहिती समजून ते स्वातंत्र्याच्या लढयात उतरले. ८० गावातून रस्ते तयार करताना त्यांनी त्याचे १० विभाग पाडले होते [38].

..

सर्व विभागावर देखरेख करण्यासाठी एक मध्यवर्ती समिती निर्माण केली होती. एवढेच नव्हे तर प्रत्येक गटाचे काम पाहण्यासाठी व ते काम उत्तम प्रकारे व्हावे यासाठी गटवार ५ ते १० लोकांची एक समिती स्थापन करण्यात आली होती. हे काम बाबुरावांनी श्रमदानाने शेतक-याकडून करून घेतले आहे. ग्रामीण जनता यात उत्साहाने सहभागी झाली होती. गावातील रस्त्यांची रुंदी १२ किंवा १४ फूट, तर गावाबाहेरील रुंदी १२ ते १४ फूट ठेवली जात असे.

खेड्याचे आरोग्यमान सुधारावे यासाठी घाण, केरकचरा गावाबाहेर टाकण्यासंबंधीची जागृती जनतेत निर्माण केली. तसेच जुन्या व नव्या विहीरींना कठडे बांधण्याचा महत्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेऊन जनतेला स्वच्छ पाणी मिळवून देण्यात बाबुराव प्रयत्नशील होते. त्यांच्या या कार्यक्रमामुळे चंदगड भागातील नारू रोगास प्रतिबंध बसला [३९].

बाबुराव प्रगतीशिल विचाराचे होते. शेतक-यांनी आधुनिक खते व बियाने वापरल्याशिवाय त्यांची प्रगती होणार नाही हे ओळखून त्यानी तज्ञांच्या मार्फत शेतक-याना मेळखताचे ( कंम्पोस्ट ) प्रात्यक्षिके दाखवून ते वापरण्यास प्रवृत केले [४०], म्हणून शेतकरी सुधारला. शेतक-याच्यावर येणा-या अनेक कठीण प्रसंगी बाबुराव त्यांच्या मदतीला धावून जात असत हे १९४६ व १९५३ च्या प्रसंगावरून दिसून येते [४१].

यशस्वी पत्रकारितेचे आदर्श उदाहरण म्हणून बाबुरावांकडे बोट दाखविता येईल. वृतपत्रकारितीकडे बाबुरावानी एक निव्वळ व्यवसाय म्हणून कधीच पाहिले नाही [४२]. त्यांच्या वृतपत्रकारितेची गणना ध्येयवादी वृतपत्रकारितेत होते. ध्येयवादी,आदर्शवादी वृतपत्रकारिता हा भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक प्रमुख प्रवाह होता.

..

राष्ट्रीय अस्मिता जागविण्याकरिता, राष्ट्र शिक्षणाच्या प्रसाराकरिता, सामाजिक अन्याय निर्मूलनाकरिता प्रि.गोपाळ गणेश आगरकर ( १८५६ - १८९५ ), लोकमान्य टिळक ( १८५६-१९२० ), महात्मा गांधी ( १८६९ - १९४८ ), डॉ.बाबासाहेब आंबेडकर ( १८९३ - १९५७ ) इत्यादि नेत्यानी आपली पत्रकारिता राबविली. त्यांच्यापासून अनेकानी स्फूर्ती घेऊन, मुख्यत: महाराष्ट्राला एक उज्वल व क्रांतिकारी इतिहास लाभला होता. त्याचाच वारसा बाबुरावांनी पुढे चालविला.

सामाजिक जागृती व शिक्षण प्रसाराशिवाय देशाचा उध्दार होणार नाही हे पूर्ण जाणून जनतेत निकोप व वैचारिक वाढीच्या अभावी, दुर्बल व कमकुवत बनलेल्या जनतेचे मानसिक दौर्बल्य कमी करून एक वैचारिक जागृती निर्माण करून देशाच्या उन्नतीसाठी तरूण पिढीस प्रवृत्त करावे [४३]. या आदर्शवादी ध्येयवादातून त्यांच्या पत्रकारितेचा जन्म झाला.

कॉंग्रेसप्रणीत स्वातंत्र्य चळवळीचा बेळगांव परिसरात प्रचार व प्रसार करण्यात तरूण भारतने मुख्य भूमिका बजावली. मुख्यत: तरूण पिढीला या चळवळीत आकर्षित करण्याचे मौलिक श्रेय तरूण भारतला जाते.

मानवतेस कलंक असणाऱ्या अस्पृश्यतेच्या, हिन्दुच्या सामाजिक अनिष्ठ प्रथांच्या निर्मूलनाकरिता त्यानी आपली पत्रकारिता राबविली [४४]. त्यानी सामाजिक सुधारणा हाच विधायक कार्याचा पाया: जातीयतेचे भूत गाडा व एका राष्ट्रीयत्वासाठी झटा.. प्राणी हत्या बंद करा,.. अस्पृश्यतेचा कलंक ... असे अनेक लेख त्यानी तरूण भारतमधून वारंवार प्रसिध्द केले [४५].

जिथे जिथे अन्याय झाला तिथे तिथे तरूण भारत पोहचला, मग तो बेळगावातील पाटणकर खटला असो किंवा बेळगाव बाहेरील सौ. काशीबाई हणबर किंवा ज्योती राजगिरे प्रकरण असो. या प्रकरणात जेंव्हा इतर वृत्तपत्रे मुक गिळून बसली होती, तेंव्हा बाबुरावांच्या तरूण भारतने सर्व प्रथम अन्यायाला वाचा फोडली आणि प्रस्थापिताकडून अन्याय परिमार्जनात आडकाठी येऊ लागली. तेंव्हा त्यानी त्या विरोधास न जुमानता संबंधिताना न्याय मिळवून देण्यासाठी आकाश पाताळ एक केले [४६].

एक ध्येयवादी पत्रकार म्हणून शुभ कार्यासाठी जनमत जागृत करण्यात आणि अन्यायाविरूध्द चिड निर्माण करण्यात ते यशस्वी झाल्याचे दिसते. अनेकदा त्यांच्यावर प्रस्थापिताकडून दडपण आणान्यात आले. पण त्यानी त्यास अजिबात जुमानले नाही. तरूण भारतने स्वातंत्र्य चळवळीस सतत पोषक लिखाण केल्यामुळे सरकार दरबारी जामिनकीही भरावी लागली [४७]. यातच तरूण भारतची लोकप्रियता सामावलेली आहे.

बाबुरावांनी पत्रकारितेकडे एक व्यवसाय म्हणून पाहिले नाही. त्याना सुरूवातीला अनेक आर्थिक अडचणीना तोंड द्यावे लागले. पण पुढे त्यानी ध्येयवाद आणि व्यवसाय यांच्यात चांगली सांगड घातली. ध्येयवादाच्या मागे लागून त्यानी व्यवसायिक अपयश स्वीकारले नाही. तरूण भारतचे आधुनिकीकरण केले, आधुनिक यंत्र सामुग्री आणली [४८]. " तरूण भारत " मधून सिनेमा जगत, युध्द वार्ता, वर्तमान सार, वार्ता विशेष [४९]. इ. सदर सादर करून त्यानी वाचक वर्ग वाढविला. कधी पुरवण्या काढल्या, महत्वाच्या प्रसंगावर विशेषांक काढले [५०].

..

(१) पांगीरे प्रकरण खास अंक ( एप्रिल,१९४५ ), (२) स्वातंत्र्यदिन विशेषांक ( १५-८-१९४७ ), कॉंग्रेस सुवर्ण महोत्सवी विशेषांक ( २८-१२-१९३५ ), लोकमान्य टिळक विशेषांक ( नोव्हेंबर,१९२० ) इत्यादि विशेषांक काढले. त्यांच्या कार्यकुशलतेमुळे, दूरदृष्टीमुळे तरूण भारतला दुर्मिळ व्यवसायीक यश लाभले, आणि दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकातील अग्रेसर वृत्तपत्र म्हणून तरूण भारतचे नांव झाले.

## बाबुरावांचे स्वभाव वैशिष्ट्य:

बाबुरावांचे स्वभाव वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्यातील नियोजनबध्दता. एका व्यक्तीपेक्षा अनेक व्यक्ती एकत्रित्या कोणतेही काम अधिक यशस्वीरित्या करू शकतात आणि म्हणून कोणतेही कार्य संस्थेव्दारे व्यवस्थित, कमी खर्चात, अधिक परिणामकारक होऊ शकते ही त्यांची धारणा होती, म्हणून कोणतेही कार्य त्यांनी अंगीकारले मग ते मासिक चालविण्याचे असो अथवा सामाजिक कार्यास वाहून घेतलेल्या संस्थेचे असो अथवा शिक्षण प्रसाराचे कार्य असो, यातून आपणास त्याची प्रचिती येते. कोणतेही कार्यक्रम राबविताना त्यांनी योजनाबध्द कार्य केले, आंधळेपणाने त्यांनी कोणताच कार्यक्रम राबविला नाही. मुख्यत: त्यांच्या नागरी कार्यात याची प्रचिती येते. रस्ते बांधणी असो विहीर अथवा गटारे खोदणे असो, ग्राम आरोग्य असो, या कार्यात योग्य क्षेत्राची निवड करणे, तेथील आर्थिक, भौगोलिक, सामाजिक माहिती गोळा करणे, योजना राबविणा-या कार्यकर्त्यांची साखळी निर्माण करणे, त्यांना योजनेची माहिती व प्रशिक्षण देणे, संबंधीत ग्रामस्थांना त्यात सहभागी करून घेणे आणि मग ती योजना राबविणे. या त्यांच्या कार्यपध्दतीमुळे त्यांच्या उपक्रमांना

..

योग्य प्रतिसाद आणि मोठे यश मिळाले हे रस्ते बांधणी व गटारे काढणे या त्यांच्या कार्यावरून दिसून येते.

बाबुरावांचे संघटना कौशल्य वादातीत होते. राजकीय, सामाजिक, शिक्षण प्रसार इ. क्षेत्रात त्यांचे संघटना कौशल्य दिसून येते.

बाबुरावांच्या स्वभावाचे तिसरे वैशिष्टय म्हणजे ते सवंग लोकप्रियतेच्या मागे लागले नाहीत किंवा सत्तेमागे धावले नाहीत हे त्यांच्या जीवन कार्याचा अभ्यास करताना अनेकदा जाणवते. त्यांच्या जीवन कार्याचा अभ्यास करताना अनेकदा जाणवते. त्यांनी केलेल्या राजकीय कार्यामुळे, शिक्षण प्रसार कार्यामुळे व वृत्तपत्रासारखे जनमत तयार करणे साधन जवळ होते या बळावर त्यांना कॉंग्रेस पक्षातर्फे निवडणूक लढवून त्या जिंकणे सहज शक्य होते. पण ते सत्तेपासून व सवंग लोकप्रियतेपासून सतत दूर राहिले. याशिवाय शिक्षण प्रसारासाठी स्थापन केलेल्या बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समितीच्या अध्यक्षपदी मिरविणे त्याना सहज शक्य होते, पण फार क्वचित प्रसंगी त्यांनी अध्यक्षपद स्वीकारल्याचे आढळते.

बाबुराव अत्यंत निग्रही होते. परिस्थिती समोर ते कधीच नमले नाहीत. शारिरीक स्वास्थ ढासळले तरी त्यांनी आपल्या कार्याकडे कधीच पाठ फिरविली नाही. स्वातंत्र्य चळवळीत गावागावातून जे आदर्शवादी, राष्ट्रप्रेमी नेतृत्व निर्माण झाले त्यात बाबुरावांची गणना होते. संसार आणि स्वातंत्र्य चळवळ यांच्यात व्यवस्थित मेळ बसवून ते एक यशस्वी जीवन जगले. एक स्वातंत्र्य सेनानी, शिक्षण प्रसारक, समाजसुधारक, आणि निर्मोह पत्रकार म्हणून त्यांच्या कार्याची नेहमीच दखल घेतली जाईल.

-000-

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

## : संदर्भ सूची :


१) सौ.प्रभू,प्रिया, समरांगण हे जीवन ज्याचे, तरुण भारत प्रेस, बेळगाव, मे १९७५, पान ३-४.

२) साप्ताहिक तरुण भारत, बेळगाव, ५-१-४७, पान १.

३) सौ.प्रभु,प्रिया, उपरोक्त, पान ३.

४) साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, २०-१-४८, पान ४.

५) किता: ता.१५-८-४७, पान १५.

६) दैनिक तरुण भारत, बेळगाव, २४-४-७९, पान २.

७) मासिक तरुण भारत, बेळगाव, जुलै १९१९, पान २१.

८) किता: पान २.

९) साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.१५-८-४७, पान १५; याळगी,विठलराव,कर्मयोगी बाबुराव, बाबुराव ठाकूर तृतीय स्मृतिदिन विशेषांक, २३-४-१९८२, पान १७.

१०) साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, १९-२-१९३५,पान ५.

११) किता: ता.२९-४-१९३०, पान ५.

१२) किता: ता.४-२-१९३२, पान ३.
ता.६-१२-१९३२, पान ५.

१३) देशपांडे,बा.य., बेळगाव जिल्ह्यातील स्वातंत्र्य संग्राम, मराठी, १९७८, पान १०९;
साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.४-१-१९४४, पान २;
साप्ताहिक, बेळगाव समाचार, ता.२७-९-१९४२, पान ३.


..

१४) सौ.प्रभु,प्रिया, उपरोक्त,पान २२.

१५) साप्ताहिक, बेळगाव समाचार, ता.५-१-१९२५, पान १.

१६) कित्ता: ता.१९-११-१९३४. पान ३.
साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.२१-११-१९३४, पान १०.

१७) सुठणकर,बा.रं. स्मृतिशलाका, स्मृतिसुगंध, बाबुराव ठाकूर तृतीय स्मृतिदिन, विशेषांक, ता.२३-४-१९८२, पान ४.
साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.१-११-१९३४, पान ३.

१८) कित्ता: ता.२६-१०-१९३७, पान ५.

१९) शानबाग,आर.डी., प्रकाशक, मानाचा मुजरा, बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समिती, सुवर्ण महोत्सवी स्मरणिका, ता.८-१-८९, पान ४६.
साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.९-११-१९३७, पान ९.

२०) कित्ता: ता.२६-१०-१९३७, पान ५.
ता.९-११-१९३७, पान ९.

२१) शानबाग,आर.डी., उपरोक्त,पान १०७.

२२) साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.१८-१-३८, पान ४.

२३) शानबाग,आर.डी., उपरोक्त, पान ४६.

२४) कित्ता: पान १०७-१०८.

२५) कित्ता: पान ८.
साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.२४-२-४८, पान २.

२६) साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.६-१२-१९३८;
व ता.१६-६-१९४२, पान ९.

..

२७) किता: ता.२६-६-१९४२, पान २.

२८) डॉ.सेर ग.श्री. स्वभाव घडविणारा शिक्षक,स्मृतिगंध, ता.२०-२-१९८२, पान ३१.

२९) मासिक, तरूण भारत, बेळगाव, जून १९२०, पान २६, नोव्हेंबर १९२२, पान २२.

३०) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.४-२-१९४१, पान ५.

३१) तेंडोलकर,र.के., बाबुरावांची कामगिरी, बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समिती स्मरणिका, पान २२.

३२) शानबाग,आर.ही., उपरोक्त, पान ७२.

३३) साप्ताहिक, अर्धसाप्ताहिक, तरूण भारत फाईल्स, १९३३-५५.

३४) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.९-६-१९३३, पान ७.

३५) किता:

३६) मासिक तरूण भारत, बेळगाव, फेब्रुवारी-मार्च १९२२, पान ३३; साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, १७-१०-१९३३, पान ७.

३७) शानबाग,आर.ही., उपरोक्त, पान ९०.

३८) किता: पान ६०;
साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.४-२-१९४१, पान ३-४;

३९) शानबाग,आर.ही., उपरोक्त, पान ६०.

४०) किता: पान ६१.

४१) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.५-२-१९४६, पान १; अर्धसाप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.२०-७-१९५३, पान २.

४२) डॉ.कुलकर्णी,जयदेवराव, बाबुरावांच्या सहवासातील ते दिवस, स्मृतिसुगंध, तृतीय स्मृतिदिन विशेषांक, ता.२३-४-८२, पान १२.

४३) मासिक, तरूण भारत, बेळगाव, जुलै १९१९, पान ३.; साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.१-८-१९२८, पान १.

४४) शानबाग,आर.डी., उपरोक्त, पान ७२.

४५) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, फाईल्स, १९३३-४३.

४६) पाध्ये,प्रभाकर, प्रस्तावना, समरांगण हे जीवन ज्यांचे, मे,१९७५, पान ५.

४७) रौप्य महोत्सवी विशेषांक, तरूण भारत, बेळगाव, ता.८-१-१९५४, पान २.

सौ.प्रभू, प्रिया, उपरोक्त.

४८) मासिक, तरूण भारत, बेळगाव, जून १९२१, पान २;

जुलै १९२३, पान २;

जून १९२४, पान २ व २५.

४९) साप्ताहिक, अर्धसाप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, फाईल्स, १९२०-१९५५.

५०) मासिक, तरूण भारत, बेळगाव, फाईल्स, १९२०-२४;

साप्ताहिक व अर्धसाप्ताहिक, तरूण भारत फाईल्स १९२८ ते १९५५.


-000-